## प्रेस नोट दि. १६/०६/२०२० पोलीस स्टेशन - वाकड

## येरवडा जेलमधुन पळुन गेलेल्या आरोपीस वाकड पोलीसांनी केले जेरबंद

--------------------------------

वाकड पोलीस ठाणे गु. र. नं. ४५९ /२०२० भादंवि कलम ३०७, ३२६, ३४ , मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१), (३) आर्म अॅक्ट कलम ४(२५) मधील मॅजि. कस्टडीतील आरोपी नामे आकाश बाबुलाल पवार वय २१ वर्षे रा. आयप्पा मंदीराशेजारी, नढेनगर, काळेवाडी, पुणे यास त्याचे साथीदारांसह मा. न्यायालय सो. यांनी दाखल गुन्हयात दि. २८/०५/२०२० रोजी ज्युडिशियल कस्टडी मंजुर केल्याने त्यास येरवडा जेल जमा करण्यात आले होते तेथे त्यांना विलगीकरणात ठेवण्यात आले होते. त्यानंतर तो ज्युडिशियल कस्टडीमधे येरवडा जेलमध्ये असताना तो व दरोडयाचे गुन्हयात ज्युडिशियल कस्टडीमध्ये असलेला आरोपी नामे हर्षद हनीफ सय्यद वय २० वर्षे रा. कासारवाडी, पुणे असे दि. १३/०६/२०२० रोजी सकाळी जेलमधील खिडकीचे गज कादुन पळुन गेले होते. त्याबाबत येरवडा पोलीस स्टेशन गु. र. नं. १८२६/२०२० भादंवि कलम २२४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर पळुन गेलेल्या आरोपींचा शोध घेणेकामी सर्व पोलीस स्टेशन येथे ब्रॉडकास्ट करण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर आरोपी यांचा शोध घेत असताना **वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस कर्मचारी शाम बाबा यांना बातमी मिळाली की, जेलमधुन पळुन गेलेल्या सदर आरोपींपैकी आरोपी नामे आकाश बाबुलाल पवार वय २१ वर्षे रा. आयप्पा मंदीराशेजारी, नढेनगर, काळेवाडी, पुणे हा काळेवाडी** येथील बालाजी लॉन येथे सदर आरोपी येणार आहे. त्याप्रमाणे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सपोनि. हरिष माने, पोउनि. सिध्दनाथ बाबर व तपास पथकाचे कर्मचारी यांनी तात्काळ सदर ठिकाणी सापळा लावुन बालाजी लॉन, काळेवाडी येथुन मिळालेल्या बातमीप्रमाणे व वर्णनावरुन मोठया शिताफीने ताब्यात घेण्यात आले आहे. त्यास येरवडा पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयाचे तपासी अधिकारी यांचेकडे गुन्हयाचे कामी हजर करीत आहोत.

सदरची कारवाई मा. श्री. संदिप बिष्णोई, सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. रामनाथ पोकळे सो. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विनायक ढाकणे सो, पोलीस उप आयुक्त, परी-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीधर जाधव सो. सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पो. स्टे. श्री हरिष माने सहा पोलीस निरीक्षक, श्री. सिद्धनाथ बाबर पोलीस उप निरीक्षक, व तपास पथकातील पोलीस कर्मचारी शाम बाबा, सागर सुर्यवंशी, बिभीषन कन्हेरकर, बाबाजान इनामदार, विक्रम जगदाळे, बापुसाहेब धुमाळ, नितीन गेंगजे, सुरज सुतार, जावेद पठाण, नितीन ढोरजे, विजय गंभीरे, विक्रम कुदळ, सचिन नरुटे, प्रमोद भांडवलकर, प्रमोद कदम, दिपक भोसले, तात्या शिंदे यांनी केली.

( डॉ. विवेक मुगळीकर )<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक<br>
वाकड पो. स्टे. पिंपरी चिंचवड